# जुगार अड्ड्यावर छापा; साडे चार लाखांचा मुद्देमाल जप्त

पुण्यनगरी दि 20/06/2023

## रोकड केवळ ९ हजारच कशी? चर्चेला उधाण



**कुंटुर / प्रतिनिधी**

कुंटुर पोलिस ठाणे हद्दीत सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा मारला खरा परंतु यात केवळ ९ हजार रुपयेच जप्त केले. याबाबत चर्चेला उधाण आले आहे. या धाडीत साडे चार लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी १० जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नायगाव तालुक्यातील कुंटुर पोलीस ठाणे अंतर्गत मौजे कृष्णूर एमआयडीसी परिसरामधील लिंबाच्या झाडाखाली जुगार अड्डा चालत असल्याची माहिती कुंटुर पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल बाहात्तरे यांनी पोलिस कर्मचाऱ्यांसह तेथे छापा मारला. या छाप्यात ९ दुचाकी, सहा आरोपी ताब्यात घेण्यात आले. काही आरोपी फरार झाले. या धाडीत जुगारींकडून केवळ ८७५० रुपये तर ९ दुचाकी जप्त करण्यात आल्या. या मुद्देमालाची किंमत ४ लाख ५० हजार ७५० रुपये दाखवण्यात आली आहे. या प्रकरणी कुंटुर पोलिस ठाण्यात १० जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे असे सपोनि विशाल बाहात्तरे यांनी सांगितले. या अड्ड्यावर १५.२० हून अधिक जण जुगार खेळत असताना केवळ ८७५० रुपये कसे जप्त करण्यात आले अशी चर्चा रंगली आहे.